स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानव्य विद्याशाखे -अंतर्गत
राज्यशास्त्र विषयातील पीएच.डी. (Doctor of Philosophy)
पदवीकरिता सादर करावयाच्या प्रबंधाची रुपरेषा

आराखडा (Synopsic)

"भारतीय संविधानातील कलम ३७० आणि जम्मू काश्मीरची स्वायतत्ता एक विश्लेषणात्मक अभ्यास"

❉ संशोधक ❉
प्रा. साके लक्ष्मण वैजेनाथ
राज्यशास्त्र विभागप्रमुख
महात्मा फुले नूतन महाविद्यालय, मिरजगांव
ता. कर्जत, जि. अहमदनगर
vaibhavraj077gmail.com 9921145584

❉ मार्गदर्शक ❉
डॉ. संतोष पाटील
राज्यशास्त्र विभागप्रमुख
दयानंद कला महाविद्यालय, लातूर
apatil2212@gmail.com 9421363056

❉ संशोधन केंद्र ❉
पिपल्स महाविद्यालय, नांदेड

वर्ष – मे २०१९

“ भारतीय संविधानातील कलम ३७० आणि जम्मू काश्मीरची स्वायतत्ता : एक विश्लेषमाणात्मक अभ्यास ”

(विषेष संदर्भ : क्र ३५ (अ) – जम्मू काश्मीर राज्यघटना आदेश १९५४)

“An Analytical Study of Constitution Article 370 and Jammu Kashmir Autonomous Status (With Special Reference Article 35 (A) - Jammu &Kashmir Constitutional Order 1954 ”

प्रस्तावना :

भारत हे संघराज्यप्रधान राष्ट्र आहे. भारताला स्वातंत्र मिळण्यापुर्वी भारत ही ब्रिटीशाची वसाहत (Colony) होती. भारतात ब्रिटीश येण्यापूर्वी भारतीय प्रदेश अनेक एत्तद्देशीय संस्थानिहाय विभागला गेलेला होता. या स्थानिकांचे प्रशासन हे वेगवेगळे होते. त्यांच्यात सुसंवाद नव्हता. जवळपास ५६५ संस्थानिक या देशात ब्रिटीश येण्यापूर्वी होते. ब्रिटीशांच्या आगमनाबरोबर ब्रिटीशांनी कंपनीद्वारे व्यापाराच्या माध्यमातून भारतावर आपले प्रशासन प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. विशेषतः सुरुवातीला बंगाल, बॉम्बे, मद्रास प्रांतात त्यांनी आपल्या कंपनीचे प्रशासन प्रस्थापित केले. त्यासाठीचे कायदेही तयार केले. पुढे या प्रांतात त्यांनी प्रांतिक सत्ता स्थापन केल्या. यावर प्रशासकीय नियंत्रणाखाली १९७३ चा रेग्युलिटी ॲक्ट प्रस्थापित केला. सन १९७५ ते १८५७ पर्यंत भारतातील प्रदेशावर कंपनीच्या माध्यमातून गव्हर्नर कारभार करत होते. पुढे १८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्याने प्रथमच राणीचे नियंत्रण प्रस्थापित झाले. ज्या भागावर राणीचे नियंत्रण होते. त्यास ब्रिटीश प्रांत तर जिथे राणीचे नियंत्रण नाही तो प्रांत संस्थानिकाचा प्रदेश म्हणून ओळखला जात होता.

संस्थानिक हे अर्ध–सार्वभौम (Semi-sovereign) झाले. हे प्रदेश ब्रिटीशांकडून प्रत्यक्ष नियंत्रणात नव्हते तर स्थानिक ब्रिटीश अधिकाऱ्यामार्फत काही विषया संदर्भात नियंत्रणात होते. काही जहागिरींना ब्रिटीशांनी निर्माण केलेले होते. या संस्थानांपैकी हैदराबाद हे सर्वात मोठे तर बाबरी हे सर्वात छोटे सस्थान होते. साधारणपणे १९४७ पूर्वी ४०% भूप्रदेश व २३% लोकसंख्या संस्थानी प्रदेशात रहात होती. या संस्थानांपैकी हैदराबाद, म्हैसूर, त्रावणकोर, जम्मू काश्मीर, सिक्कीम, इंदोर इत्यादी.

संस्थानिकांचे खालसा धोरण (Doctrine of Lapes) हे भारतात लॉर्ड डलहौसी या गव्हर्नर जनरलने आणले. हे धोरण १८४८ ते १८५६ पर्यंत होते. या धोरणांतर्गत डलहौसीने वारस नसल्याकारणाने व प्रशासकीय गोंधळ या कारणाने बरीच संस्थाने खालसा करुन ब्रिटीश अमलाखाली आणली. विशेषतः सातारा (१९९४९), नागपूर व झाशी (१९५४), तोरे व सरकोट (१९५५) व उदयपूर, औंध (१८५६) या धोरणाममुळे भारतातील अनेक संस्थानांमध्ये असंतोष पसरला म्हणून हे धोरण १८५७ च्या उठावानंतर बंद करण्यात आले.

न १९३५ च्या भारत संघराज्य कायद्याव्दारे ब्रिटीश प्रांत व संस्थानिक यांचे मिळून संघराज्य आणण्याची योजना होती. पण ती प्रत्यक्ष उतरवता आली नाही. जम्मू काश्मीर हे एक मोजक्या प्रमुख संस्थानांपैकी एक संस्थान ज्याचे क्षेत्रफळ २००००० चौ.की.मी. होते. ज्याची लोकसंख्या ४० लाख (४ मिलीयन) होती. ५४५ संस्थानांपैकी जवळपास बरीच संस्थाने भारतात सामील झालेली होती. ती सर्व शांततापूर्ण पध्दतीने झालेली होती. पैकी हैदराबाद, जम्मू काश्मीर, जुनागढ व कालत इत्यादी संस्थानिक भारतात सामील व्हायला तयार नव्हते. पैकी जम्मू काश्मीर हे १८४६ पासून १९५२ पर्यंत संस्थान होते. ज्यावर जमवाल राजपूत डोगरा घराण्याची सत्ता होती. या राज्याची निर्मिती १८४६ ला त्या काळच्या शीख साम्राज्यातून झालेली होती. शीख राज्य हे अँग्लो–शीख युध्दातून उदयास आले होते. पुढे ईस्ट इंडिया कंपनीने काश्मीर खोरे, लडाख, व गीलगीट–बलुचीस्तान इत्यादी प्रदेश कंपनीला जोडले व त्यांचे प्रशासन राज्य गुलाबसिंग याकडे सोपविले. हा प्रदेस पुढे राजा हरिसिंगाकडे आला. (१९२५ ते १९६१)

भारताला स्वातंत्र देण्याची पंतप्रधान ॲटलीनी घोषणा केली. त्याप्रमाणे लॉर्ड माऊटबॅटन यांनी भारताच्या फाळणीची योजना आखली. त्याप्रमाणे तीन पर्याय निर्माण केले होते. संस्थानिकांत भारत किंवा पाकिस्तान किंवा स्वतंत्र राहण्याचा पर्याय दिला. त्याप्रमाणे तत्कालीन राजा महाराज हरिसिंग याने सुरुवातीला स्वतंत्र राहण्याचे ठरवले. तेव्हा पाकिस्तानने काश्मीरच्या संस्थानांवर हल्ला केला. काश्मीरमध्ये राजा हिंदू होता पण बहुसंख्या जनता मुस्लिम होती. राजा हरिसिंगाने भारतात सामील होण्याचा निर्णय घेतला त्यासाठी समीलनाम्यावर सही करण्यास

संमती दिली. (Instrument of Acession) हा समीलनामा करार भारत सरकारच्या सन १९३५ कायद्याने तयार करण्यात आला होता. जो १९४७ पर्यंत वापरला गेला. महाराजा हरिसिंगाने २६ ऑक्टोबर १९४७ ला सामीलनाम्यावर स्वाक्षरी केली. पण पाकिस्तानी सैन्याने काश्मीरचा काही प्रदेश आपल्या ताब्यात ठेवला. १ जानेवारी १९४९ रोजी नेहरुंनी हा प्रश्न आंतरराष्ट्रीय न्यायालयात नेवून जैसे थे ची स्थगिती मिळविली म्हणून आज तो प्रदेश पाकव्याप्त काश्मीर (POK) म्हणून ओळखला जातो. ज्यामध्ये मिरापूर–मुझ्झफराबाद, उत्तर काश्मीर आता गीलगीट बलुचिस्तान म्हणून ओळखला जातो.

भारताची राज्यघटना २६ जानेवारी १९५० ला लागू करण्यात आली. तेव्हा घटनेत कलम ३७० ची तरतुद करण्यात आली. ज्याचा उल्लेख 'अस्मानी तरतुद ' (Temporary Provision) अशी आहे. राज्यघटना अस्तित्वात आल्यानंतर राज्याचे जे अ, ब व क भाग करण्यात आलेले होते ते नष्ट करून सर्व भागांना राज्य (State) असा दर्जा देण्यात आला. (राज्य पुर्नरचना आयोग–१९५६) १९५० ला बारत सरकारने कलम ३७० संदर्भात श्वेतपत्रिका काढली. त्यानुसार कलम ३७० संदर्भात दोन निर्णय घेण्याचे ठरले. १) जम्मू काश्मीरची राज्यघटना परिषद बोलावून निर्णय घेतला जावा, २) राज्यघटना परिषद एक तर हे कलम रद्द करण्याची शिफारस करेल. किंवा त्यात सुधारणा करेल. त्यानुसार ऑक्टोबर १९५१ पासून जम्मू काश्मीर च्या घटना परिषदेची निवड झाली. ज्यात जम्मू प्रजा परिषदेने निवडणुकींवर बहिष्कार घातला. तर राष्ट्रीय कॉफरन्स पक्षाने बिनविरोध निवडणूका जिंकल्या ज्या परिषदेने कलम ३७० भाग –२१ यावर कसलाही निर्णय न गेता २५ जानेवारी १९५७ ला संपुष्टात आली. ज्यामुळे कलम ३७० तसेच राहून गेले.

तत्पुर्वी पं. नेहरू व शेख अब्दुल्ला यांच्यात २४ जुलै १९५२ ला दिल्ली करार (Delhi Agreement) हा करार मान्यतेशिवाय होता. ज्यामध्ये पुढील तरतुदी करण्यात आलेल्या होत्या.

१) राज्याचा प्रमुख सदर–ए–रियासत (Sadar -I- Riyasat) म्हणून ओळखण्यात यावा.

२) भारताच्या ध्वजाबरोबर राज्य वजालाही तेवढाच दर्जा असावा.

३) नागरिकांचा दर्जा व ओळख ठरविण्याचा अधिकार राज्य विधानसभेला असावा.

४) मुलभूत हक्क हे राज्याच्या जमीन सुधारणा कार्यक्रमाच्या आड येऊ शकत नाहीत.

५) राज्यांतर्गतची आणीबाणी राज्य सरकारच्या शिफारशीने लागू करण्यात यावी.

६) सर्वोच्च न्यायालय राज्य व केंद्र यांच्यातील भांडणे राज्याच्या सहमतीनेच निर्णय देऊ शकते.

फेब्रुवारी १९५४ ला राज्य घटना परिषदेने राज्याच्या समितीकरणाचा ठराव मंजूर केला आणि राष्ट्रपतीने १९५४ ला जम्मु काश्मीर राज्यघटना अध्यादेश (The Constitution (Application to Jammu & Kashmir) Order 1954) पास करण्यात आला. या आदेशातील सेक्शन २ (३) व २ (४) ज्यात भाग-२ नागरिकत्वाशी तर भाग -३ मूलभूत हक्कांशी संबंधित आहे. या आध्यादेशाव्दारे जम्मू काश्मीरच्या विधीमंडळात नागरिकत्वासंबंधी किंवा स्थायी नागरिकत्वासाठीचे नियम बनविण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. त्यानुसार सेक्शन २ (४)(J) नूसार कलम ३५ (A) राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आले.

या कलम ३५ (A) नुसार जम्मु काश्मीरचे नागरिकत्व व रहिवासासंबंधी, संपत्ती धारण करण्यासंबंधीचे अधिकार राज्य विधानसभा ठरवू शकते. ज्यामुळे ही तरतूद भारतीय राज्यघटनेच्या तरतूदींशी विसंगत ठरते. उदा. भारतीय राज्यघटना कलम १२ ते १५ जम्मू काश्मीर राज्याला लागू असणार नाही. हे एकप्रकारे उर्वरीत भारतीय नागरिकांवर अन्याय करणारे आहे. (This is the defiance of the Indian Constitution)

प्रस्तुत संशोधन प्रबंधामध्ये कलम ३७० व कलम ३५ (A) तरतुदीचा जम्मु काश्मीर व उर्वरीत भारत देश या संदर्भात कायदेशीर संबंधाचा आढावा घेण्यात येणार आहे. या तरतुदींचा आजपर्यंतचा प्रवास व या तरतुदींना वर्तमान काळात होत असलेला विरोध त्यासाठीची न्यायालयीन लढाई आणि या तरतुदी नष्ट केल्या तर होणारे संभाव्य परिणाम इत्यादी विविध पैलू या प्रश्नाच्या अनुषंगाने प्रस्तुत शोधप्रबंधात सविस्तर तपासले जाणार आहेत.

उद्दिष्ट्ये :-

* जम्मू काश्मीर निर्मितीच्या इतिहासाची आढावा घेणे.
* जम्मू काश्मीरच्या संदर्भात संविधान सभेतील चर्चा अभ्यासणे.

* जम्मू काश्मीर बद्दलच्या विशेष तरतुदींचा अभ्यास करणे.
* विशेष तरतुदी भारतीय राज्यघटनेतील विशेष तरतुदी विसंगत ठरतात याचा अभ्यास करणे.
* जम्मू काश्मीर व उर्वरीत भारताच्या संबंधाचा आढावा घेणे.
* जम्मू काश्मीरच्या स्वायतत्तेचा पुनर्विचार करणे विशेषतः भारतीय संसद व सवोच्च न्यायालय
* स्वायतत्ता रद्द करण्यासंदर्भात विविध राजकीय पक्ष व भारतीय जनमताचा आढावा घेणे.

गृहितके :–

* घटना निर्मितीच्या सुरुवातीपासूनच जम्मु काश्मीरला विशेष दर्जा देण्यात आलेला आहे. क. ३७०
* क. ३५ (अ) फक्त काश्मीर रहिवासासाठीच लागू आहे.
* क. ३५ (अ) हे भारतीय राज्यघटनेतील काही तरतुदींचे उल्लंघन करते.
* क. ३५ (अ) जम्मू काश्मीरच्या विकासात अडथळा आणते.
* क. ३५ (अ) हे कलम रद्द करता येते.

संशोधन पध्दती :–

सदर संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा निश्चित करण्यात आलेला असून संशोधनाचा विषय व त्या अनुषंगाने उपस्थित करण्यात आलेली गृहितके यांचा आढावा घेण्यात येणार आहे. पैकी सर्व गृहितके प्राथमिक व दुय्यम माहिती स्त्रोतांच्या आधारे संकलीत करण्यात आलेल्या माहितीचे योग्य वर्गीकरण करुन वरील गृहितके सिध्द किंवा बाद करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

सदर संशोधन विषयाची माहिती ही विशेषतः दुय्यम स्त्रोतांव्दारे संकलीत करण्यात येईल. ज्यामध्ये भारतीय राज्यघटना, जम्मू काश्मीरची राज्यघटना, जम्मू सरकार व केंद्र सरकार यांच्यातील करार तसेच समिती अहवाल इत्यादी प्राथमिक सामग्रीचा अभ्यास केला जाणार

आहे. दुय्यम स्त्रोत या संशोधन विषयाशी संबंधीत अभ्यास अहवाल, तज्ञांची पुस्तके अभ्यासली जाणार आहेत.

संशोधनाची व्याप्ती व महत्व :-

व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती व मर्यादा पुढील स्वरुपात असतील. हा संशोधन प्रकल्प प्रामुख्याने दुय्यम साधन सामुग्रीवर आधारित असणार आहे. तसेच कालावधी हा १९४७ ते २०१८ पर्यंत निश्चित करण्यात आलेला आहे. या दरम्यानचा सर्व घटनांचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच संशोधनचा मुख्य गाभा हा कलम ३५ (A) व त्यातील तरतुदी आणि त्या तरतुदी या भारतीय राज्यघटनेशी कशा विसंगत आहेत आणि त्यावरील वर्तमानकालीन चर्चा यासंबंधित असणार आहेत. केवळ वैज्ञानिक व कायदेशीर चर्चेच्या मर्यादेत राहून याचा अभ्यास केला जाणार आहे.

महत्व :-

प्रस्तुत संशोधन प्रकल्प हा जम्मू काश्मीर या राज्याच्या स्वायतत्तेच्या दर्जा संदर्भात अभ्यास करणार असून हा विशेष दर्जा ज्यामुळे प्राप्त झाला, त्या कलम व ३७० व ३५ (अ) या कलमांचा विशेष अभ्यास आणि त्याची सद्यकालीन प्रासंगिकता तपासण्याचा मुख्य हेतू आहे. म्हणून हा प्रकल्प महत्वाचा ठरणार आहे. ज्यामध्ये स्वातंत्र्यपूर्वकालीन संस्थानिकांचा इतिहास, जम्मू-काश्मीरचा सामीलनामा पुन्हा या करारानुसार प्राप्त झालेला विशेष दर्जा व त्या दर्जाच्या पुनर्विचाराची चर्चा इत्यादींचा समावेश आहे. एका मार्गाने हा प्रकल्पव्दारे या तरतुदीचा सविस्तर आढावा घेण्यात येणार आहे. म्हणू हा संशोधन प्रकल्प महत्वाचा ठरू शकेल असे वाटते.

संदर्भ साहित्याचा आढावा :-

सदरील संशोधन विषय हा सद्य परिस्थितीत अत्यंत महत्वाचा असून या विषयावर पूर्वी काही संशोधकांनी प्रकाश टाकण्याचा आपापल्या पध्दतीने प्रयत्न केलेला आहे. प्रस्तुत संशोधनाचा मुख्य विषय हा कलम ३७० पेक्षा कलम ३५(अ) हा असून यामुळे जम्मू आणि काश्मीरमधील नागरिकांच्या रहिवासाच्या संदर्भात प्रामुख्याने विचार केला जाणार आहे.

ही तरतुद काश्मीर राज्यघटना आदेश १९५४, से. ३(४) कलम ३५ (अ) अन्वये करण्या आली असून ही तरतदु भारतीय राज्य घटनेच्या मुलभूत हक्कांविरोधात कायदेभंग करणारी असून या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात या तरतुदीस आव्हान देण्यात आलेले आहे. तरी प्रस्तुत संशोधनापुर्वी या संदर्भात जे संशोधन झालेले आहे, त्या संशोधन साहित्याचा आढावा घेणे हा संशोधन प्रक्रियेतील महत्वाचा टप्पा असतो. म्हणून यात संशोधन विषयापुर्वीचा थोडक्यात आढावा घेण्यात आलेला आहे. ज्यामुळे प्रस्तुत संशोधनात पुनरावृत्ती टाळली जाऊन अधिक विशेष अंगाने अभ्यास करण्यास मदत होईल हा या मागचा हेतू आहे.

'Insight IAS' या प्रस्तुत लेखामध्ये जानेवारी २०१९ मध्ये 'Article 35 (A) & Related Issues' या शिर्षकाखाली कलम ३५ (A) या कलमामुळे भारतीय एकात्मतेसमोरील अडथळे आणि वर्गात आणखीन वर्ग या संदर्भात निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत. 'Article 35 (A) and the future of stability in Kashmir' या लेखात ध्रुव सी. काटीच यांनी कलम ३५ (A) चा इतिहास भारतीय राज्यघटनेशी कसा विसंगत आहे. यावर चर्चा केलेली असूनहे कलम घटनेच्या कलम १४ आणि १६ चे उल्लंघन करते असे म्हटलेले आहे.

प्रकरण मांडणी

प्रकरण पहिले – ब्रिटीश वसाहतिक पार्श्वभूमी व राज्यनिर्मिती

सदर प्रकरणात ब्रिटीशकालीन भारत व ब्रिटीशांच्या धोरणाचा आढावा घेण्यात आलेला आहे. ब्रिटीशांच्या आगणानापासून ते भारताला सत्ता हस्तांतर करणेपर्यंत म्हणजेच १५ ऑगष्ट १९४७ ब्रिटीशांची विविध प्रशासकीय धोरणे व कायदे आणि त्यातील तरतुदींचा भारताच्या प्रशासनावर काय परिणाम झाला याचा सविस्तर ऐतिहासिक आढावा घेऊन प्रांताच्या संदर्भातील ब्रिटीश धोरणे काय होती, संस्थानिक व ब्रिटीश प्रांत यांचे प्रशासन कसे होते, संस्थानिकांना कसे प्राधान्य दिले गेले, स्वातंत्र्यलढ्याच्या उत्तरार्धात संस्थानिकांची मानसिकता विशेषतः भारत पाकीस्तानच्या फाळणीनंतर भारत सरकारचा १९५५ चा कायदा व भारतीय स्वातंत्र्याचा कायदा १९४७ याचा आढावा घेऊन राज्यनिर्मितीची पुनर्ररचना व संस्थानिकांच्या भारतातील समावेशा संबंधीच्या घटनांचा आढावा घेण्यात आलेला आहे.

प्रकरण दुसरे- जम्मू काश्मीरचा विशेष दर्जा व भारतीय राज्यघटना

प्रस्तुत प्रकरणात भारत-पाकिस्तानच्या फाळणीनंतर एकमेव राज्य म्हणजे जम्मू आणि काश्मीर जे स्वातंत्र्यांतर विशिष्ट अटी व करारावर भारतात सामील झाले. त्या सामीलनाम्याच्या अटी नेहरू, व शेख अब्दुल्ला यांच्यातील यांच्यातील करार १९५२ (दिल्ली करार) जम्मू-राज्यघटना आदेश -१९५४ व त्यातील कलम ३५ (A) आणि भारतीय राज्यघटना कलम ३७० इत्यादी तरतुदींचा सविस्तर घटनात्मक व कायदेविषयक आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे- १९४७ ते २०१४ पर्यंतचा जम्मू काश्मीर संदर्भातील आढावा

या प्रकरणात जम्मू - काश्मीर भारतात सामील होण्यापासून २०१४ ते २०१८ पर्यंतच्या राजकीय घडामोडींचा आढावा घेण्यात येणार आहे. ज्यामध्ये राज्य करकारचे विविध ठराव, भूमिका, तसेच केंद्र सरकारची भूमिका व ठराव इत्यादींचा आढावा असणार आहे. याच काळात राज्यातील विविध फुटीरतावादी गट, तेथील प्रादेशिक राजकीय पक्ष व भारतातील प्रमुख राजकीय पक्ष यांच्या धोरणांचा त्यात समावेश असेल. पाकिस्तान प्रस्तुत दहशदवाद आणि त्याला भारताने दिलेले प्रत्युत्तर तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर या विषयाच्या संदर्भातील चर्चा भूमिकांचा आढावा असणार आहे.

प्रकरण चौथे-कलम ३७० व ३५(अ) आणि विविध राजकीय पक्षांची, जनतेची मत-मतांतरे

या प्रकरणात संशोधन विषयाचा प्रमुख आधार किंवा विषय असल्यामुळे अधिक सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधन प्रकल्पात कलम ३७० व कलम ३५(अ) या संदर्भातच जास्त अभ्यास करून वस्तुस्थिती व निष्कर्ष मांडावयाचे असल्याने कलम ३७० व कलम ३५(अ) या तरतुदींचा सविस्तर आढावा तसेच या तरतुदींमुळे जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा दिल्यामुळे या राज्याचा विकास व इतर भारतीय नागरिकांना घटनेतील कलम १४,१९,१६ यांनी दिलेले हक्क नाकारले जातात म्हणून ही कलमे भारतीय घटनेशी विसंगत ठरत आहेत. त्यामुळे ही दोन्ही कलमे रद्द करण्यात येऊन जम्मू-काश्मीरचा विशेष दर्जा रद्द करण्यात यावा. या संदर्भातील विविध याचिका, राजकीय पक्षांची भूमिका, देशातील जनतेची भूमिका, जम्मू-काश्मीरमधील जनतेशी व राजकीय नेत्यांची भूमिका इत्यादींचा आढावा घेतला जाणार आहे.

म्हणून सदरील प्रकरण हे संशोधन प्रकल्पातील महत्वाचे प्रकरण म्हणून समजले गेलेले आहे.

प्रकरण पाचवे– कलम ३५ (A) व नागरिकत्वासंबंधीच्या अटी

प्रस्तुत प्रकरण हे प्रत्यक्ष संशोधन समस्येसंदर्भात असून भारतीय राज्यघटनेतील नागरिकत्वाची व्याख्या, अटी व स्वरूप याबद्दल माहिती असणार असून जम्मू–काश्मीर राज्यघटना आदेश सेक्शन – ६, कलम ३५ (A) या नागरिकत्वासंबंधीच्या कलमाच्या तरतुदींचा इतिहास व स्वरूप यांचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच या नागरिकत्वासंबंधी विशेष तरतुदींचा सविस्तर अभ्यास व भारतीय राज्यघटनेच्या नागरिकत्व कलम ५ ते ११ या संबंधातला तुलनात्मक अभ्यास या संदर्भातले सविस्तर विवेचन असणार आहे.

प्रकरण सहावे– संसद व न्यायालयीन उपाययोजना

प्रस्तुत प्रकरणात कलम ३७० व विशेष नागरिकत्व कलम ३५ (A) या संदर्भातील संसदेचे अधिकारक्षेत्र व न्यायालयाची भूमिकी यासंदर्भात आढावा घेतला जाणार आहे. न्यायालयाच्या व संसदेच्या दुरुस्तीविषयक अधिकाराचा आढावा घेण्यात येऊन कलम ३६८ नुसार घटनादुरुस्ती व कलम ३७० या संदर्भातील संविधानात्मक तरतुदींचा अभ्यास केला जाणार आहे. न्यायालयीन तोडगा किंवा उपाय यांचाही अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण सातवे– ३५ (अ) कलमाचे जम्मू काश्मीरवरील संभाव्य परिणाम

प्रस्तुत प्रकरणात ३५ (A) कलमाचे जम्मू–काश्मीर वरील संभाव्य परिणामांचा अभ्यास करण्यात येणार आहे. हे कलम अस्तित्वात असणे किंवा घटनेतून काढून टाकणे यामुळे जम्मू काश्मीरची स्वायतत्ता व नागरिकत्वाच्या तरतुदींवक काय परिणाम होऊ शकतो याचा अभ्यास केला जाणार आहे. या कलमाची प्रासंगिकता तपासली जाणार आहे. त्यासाठीच संभाव्य विरोध व न्यायालयीन लढाईचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण आठवे– निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणात हे शेवटचे असून या प्रकरणात अभ्यासाअंती आलेल्या माहितीच्या आधारे निष्कर्ष मांडले जातील. तसेच गृहितकाची तपासणी करुन सिध्द किंवा बाद गृहितकांची चर्चा केली जाणार आहे. तसेच अभ्यासाअंती निष्कर्षांच्या आधारावर काही उपाययोजनांची

चर्चा केली जाणार आहे. तसेच तज्ञांची मते, अभिप्राय हेही तपासले जाणार आहेत.

परिशिष्टे

१) नकाशे

२) ठराव

३) संदर्भ ग्रंथ सूची

संदर्भ ग्रंथ

1) The Constitution (Application to Jammu And Kashmir) Order 1954, Published in the Gazette of India Extraordinary Part-II, Section-3, May 14, 1954

2) E.W.R. Lumby, *The transfer in India, 1945-47* (London: George Allen & Unein Ltd.)

3) Anil Gupta, " Kashmir Special Status : Contentious Constitutionl Provisions", Indian Defence Review, available at http://www.indiadeferencre.com/ Kashmir- special-status-contentious-constitutional-provisions

4) Vijay Kranti, "Artical 35 (A) is almost like Apartheid," The Sunday Guardian, Septmber 03, 2017, available at http.www.sundayguardianlive.com/news/ 10755-articla-35a-almost-aparthed.

5) Subhash C. Kashyap. (2015) "Our constitution", National Book Trust, India.

6) Subhash C.Kashyap. (2013) "Citizen & constitution", National Book Trust, India.

7) Dhruv, C. Katoch (2017) "Art. 35(A) and the future of stability in Kashmir." Claws Jounrnal Winter.

8) Brines, Russel (1968), "The Indo-Pakistani Conflict." New York, Pall Malli.

9) Schfield Victoria (1996) “Kashmir in the Crossfire”, London, I.B. Tauris

10) Tariq Ali & Arundhati Rao (1999) “Kashmir”

11) A.G. Noorani (2010) “Article 370:A Constitutional History of Jammu & Kashmir

12) Zafar Choudhari (2015) “Kashmir Conflict & Muslim of Jammu”

13) Iffat Malik (2002) “kashmir : Ethnic Conflict International Dispute”,

14) Joyti Basun (2012) “Jammu Kashmir”, Springer Publication.

15) जगमोहन (अनु. मो.ग.तपस्वीस सुधीर जोगळेकर)(२०१६) काश्मीर धुमसते बर्फ मोरया प्रकाशन

16) ना. य. डोळे/रश्मी भुरे (२०१६), काश्मीर प्रश्न, शब्द प्रकाशन

17) शेषराव मोरे (१९९५), काश्मीर एक शापीत नंदनवन, राजहंस प्रकाशन

18) रविंद्र दाणी, मिशन काश्मीर, अमेय प्रकाशन

संशोधक
प्रा. साके लक्ष्मण वैजेनाथ

मार्गदर्शक
प्रा. डॉ. संतोष पाटील